प्रेस नोट १४ दिनांक २४/०८/२०२४

**ट्रॉम्बे पोलीसांनी अनोळखी महिलेच्या खुनाचा गुन्हा २४ तासाच्या आत उघडकीस आणलेबाबत...**

दिनांक २३/०८/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजताचे सुमारास ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत एका गोणीमध्ये अनोळखी महिलेचा मृतदेह अर्धवट कुझलेल्या स्थितीत मिळून आला. त्या अनुषंगाने ट्रॉम्बे पोलीस ठाणेस कलम १०३(१), २३८ भारतीय न्याय संहितेअन्वये खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या तपासाचे अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली ०२ सहायक पोलीस आयुक्त यांचे नेतृत्वात १० पथके तयार करण्यात आली. सदर पथकांनी अथक परिश्रम करून २४ तासाच्या आत मिळून आलेल्या माहितीच्या आधारावर अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्यात यश मिळविले. मृतदेहाची ओळख पटल्यानंतर नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने ०३ पुरूष व ०२ महिलांना ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेतलेल्या संशयित इसमांमध्ये मयताचा पती, दीर, नंदोई, नंदोइची आई व बहिण असून सदर गुन्हा प्रथमदर्शनी कौटुबिक वादातून झाल्याचे दिसून येत आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

सदर उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त, मा. श्री देवेन भारती, सह पोलीस आयुक्त श्री सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग, श्री राजेश बाबशेट्टी, सहायक पोलीस आयुक्त, नेहरूनगर विभाग, श्री शशिकांत भंडारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई श्री राजेश शिंदे, पोलीस निरीक्षक गुन्हे, श्री फरीद खान, सपोनि सचिन काटकर, केदार वायचळ, सुशील लोंढे, नवनाथ काळे दिपक दळवी, प्रशांत मोरकाने, भोसले व पोउनि शरद नाणेकर, भाउसाहेब माळवदकर, विजयसिंह देशमुख, ऋषिकेश बाबर, अजय गोल्हार, अभय काकड, अनिल बांगर, अमोल चाटे, अनिल महारनुर, गणेश कर्चे, राजू साळुंखे व पथक यांनी केली.

::::----------::::